नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/११/२०२५ (गुरूवार )**

---

## संघटीतरित्या अवैध देशीदारूची विक्री करणाऱ्या टोळीवर नविन कायदा भारतीय न्याय संहीता कलम ११२ (किरकोळ संघटित गुन्हेगारी) अन्वये कारवाई आरोपींना अटक ,मा. न्यायालयाने दिली पोलीस कोठडी सावनेर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन सावनेर येथील दाखल अपराध क्रमांक १००३/२०२५ कलम ६५ (ई) ,८३ म.दा.का मधील आरोपी नामे **१. नितीन तेजराम देखमुख, वय ४२ वर्षे, रा तेलकामठी, २. नंदकिशोर गुणाजी डांगे, वय ४० वर्षे, रा तेलकामठी, आणि ३. राजु दामोदर कश्यप , वय ५३ वर्षे, रा. सावनेर** यांच्यावर पोलीस सावनेर येथे २००७ पासुन सतत गुन्हे नोंद असुन नमुद आरोपी अवैध दारू विक्रीचे गुन्हे टोळीने करीत असतात.

यातील आरोपी नामे नितीन तेजराम देखमुख हा **टोळी प्रमुख असुन २. नंदकिशोर गुणाजी डांगे, ३. राजु दामोदर कश्यप हे सदस्य आहेत**. सदर टोळीचा प्रमुख हा स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैध दारू विक्री करतो तसेच त्याच्या टोळी सदस्यांना दारू विक्री करायला लावतो. टोळीचे सदस्य टोळी प्रमुखाच्या सांगण्याप्रमाणे अवैध दारू विक्री करतात. तसेच नमुद टोळी प्रमुख नितीन तेजराम देखमुख आडदांड आणि खुनसी स्वभावाचा असुन तो आपल्या टोळीसह बेकायदेशिर कृत्य करून टोळीचे वर्चस्व निर्माण करून परीसरात दहशत पसरवितो. नमुद आरोपीतांच्या टोळीवर एकुण ७ गुन्हे नोंद असुन नमुद आरोपीतांच्या टोळीवर कारवाई करत अपराध क्रमांक १००३/२०२५ कलम ६५ (ई) ,८३ म.दा.का या गुन्हयात नमुद टोळीवर मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर (प्रभारी) यांच्या मार्गदर्शनात सावनेर पोलीसांनी

भारतीय न्याय संहीता कलम ११२ ( किरकोळ संघटीत गुन्हेगारी ) या कलमान्वये कारवाई केली.

**सावनेर पोलीसांनी टोळी प्रमुख १. नितीन तेजराम देखमुख, वय ४२ वर्षे, रा तेलकामठी, आणि टोळी सदस्य २. नंदकिशोर गुणाजी डांगे, वय ४० वर्षे, रा तेलकामठी यांना सदर गुन्हयात अटक करून प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता मा.प्रथमवर्ग , न्यायालय, कळमेश्वर यांनी नमुद आरोपीतांचा दिनांक १४/११/२०२५ रोपी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.नागपुर जिल्हया मध्ये संघटीतरित्या अवैध दारू विक्री करणाऱ्यावर सतत अशा प्रकारच्या नविन कायदा भारतीय न्याय संहीता कलम ११२ (किरकोळ संघटित गुन्हेगारी) अन्वये कारवाया करण्यात येत आहेत.**

## नरखेड पोलीस , पांढुर्णा पोलीस आणि उत्पादन शुल्क विभाग, मध्य प्रदेश यांनी महराष्ट्र – मध्यप्रदेश राज्य सिमेवरील अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्यां आरोपीतांवर केली संयुक्तीक कारवाई

मध्यप्रदेश राज्यात सिमेवरील काही गावांमध्ये अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारु काढुन सदर दारू महाराष्ट्र राज्यात पुरवली जाते. त्याअनुषंगाने दिनांक १३/११/२०२५ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नरखेड पोलीस यांनी पोलीस स्टेशन पांढुर्णा अंतर्गत पोलीस चौकी बडचिचोला आणि उत्पादन शुक्ल विभाग, मध्य प्रदेश यांच्यासह संयुक्तीक कारवाई करत महाराष्ट्र – मध्यप्रदेश सिमेवरील मध्यप्रदेश हद्दीतील ग्राम वड्डामाल आणि कोंडर येथील अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारु काढणाऱ्या आरोपीतांवर कारवाई केली असता नाल्याच्या किनाऱ्यांवरील सुरू असलेल्या तीन मोहाफुल दारूच्या भट्टया नष्ट करत एकुण ८५०० किग्रॅ मोहाफुल सडवा आणि ६५ लिटर मोहाफुल दारू असा मुददेमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला आहे. ६ गुन्हे नोंदविण्यात आले.







## अल्पवयीन बालीकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कन्हान :— फिर्यादी यांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कन्हान येथे अप क्र. ७२१/२३ कलम ३७६(एबी), ३७६(२)(जे), ३७६(२)(आय), ३७६(२)(एन), भादंवि सहकलम ४, ८, १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, यातील फिर्यादी ही तिच्या अल्पवयीन मुलीला घरी ठेवुन रोजमजुरीच्या कामावर गेली असता यातील आरोपीने अल्पवयीन पिडीतेसोबत लैंगिक अत्याचार केला. श्री एस.जी.बेंद्रे, सहा. पोलीस निरीक्षक, नेम पोलीस स्टेशन कन्हान यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिंनाक १३/११/२०२५ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश ०३ श्री एस.एच. ग्वालानी यांनी नमुद आरोपी धनराज रामदास सव्वाशेरे, वय ४० वर्षे रा. कांद्री कन्हान जि. नागपुर यास **कलम ३३७६(२)(एफ), ३७६(२)(जे), ३७६(२)(आय), ३७६(२)(एन) आणि कलम ६ आणि कलम १० पोक्सो मध्ये दोषसिध्दी करार देवुन कलम ६ आणि कलम १० पोक्सो मध्ये २० वर्षे सश्रम कारावास व १०,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ६ महीने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती रश्मी खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस अंमलदार ईश्वर हुड, ब.नं २३५० यांनी मदत केली आहे.

## ४ वर्षापासुन बेपत्ता असलेल्या अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन मौदा येथे दिनांक २०/०९/२०२१ रोजी दाखल अप क्र ५७९/२०२५ कलम ३६३ भादवि अन्वये गुन्हयातील ४ वर्षापासुन मिळुन येत नसलेल्या अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखडे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, पोशि पन्नालाल बटाउवाले त्यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. नमुद अपहृत मुलगी ही दरम्यान काळात रजेगाव, राज्य मध्यप्रदेश येथे असल्याचे तांत्रिक पुराव्यावरून निदर्शनास आले होते. परंतु नमुद मुलगी ही मिळुन येत नव्हती. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण चे तपास पथक सतत तांत्रिक पुराव्यांची पडताळणी करत होते. दिनांक १२/११/२०२५ रोजी तांत्रिक पुराव्यावरून नमुद गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध घेवुन पारडी, नागपुर, जि. नागपुर येथुन ताब्यात घेतले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मौदा पोलीस करीत आहेत.

# नरखेड पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील गुन्हेगार प्रफुल राजेंद्र मेटांगळे याला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांनी पोलीस स्टेशन नरखेड हद्दीतील अभिलेखावरील आरोपी प्रफुल राजेंद्र मेटांगळे याला हद्दपार केले.**

नमुद आरोपी याचेवर शरीरीविरूध्दचे आणि मालमत्तेविरूध्द चे गुन्हे नोंद असुन . नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने त्याची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितो तसेच त्याच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायद व सुव्यवस्थेचा प्रशन निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव नरखेड पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून **नमुद आरोपीला २ महीन्यांकरीत नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी.**



**प्रफुल राजेंद्र मेटांगळे**

## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री, तसेच सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १६ गुन्हे नोंद

**दिनांक १२/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू तसेच ईतर साहीत्य असा एकुण १,६४,०४०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन काटोल येथे एकुण ५ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवणी येथे २ गुन्हे नोंद आह. पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हा नोंद आहे. असे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १६ गुन्हे नोंद केले आहे.

सदर कारवाईत ५२२० मिली देशी दारू किंमती २५४० /—रूपये, ७१ लीटर मोहाफुल दारू किंमती ७१००/— रूपये, ४००० लिटर सडवा,किंमती १,४०,०००/—रूपये, तसेच ईतर साहीत्य किंमती १४,४००/— रूपये  असा एकुण १,६४,०४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नााशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने